# महाराष्ट्र शासन

## जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे

## नगरपरिषदांमध्ये राज्यस्तरीय संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबतची जाहिरात.

## जाहिरात क्र. न.पा.-२/संवर्ग पदभरती/कावि/ /२०१२, दि. /१२/२०१२.

मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कडील पत्र क्र. नपप्रसं कक्ष-५/संवर्ग/श्रेणी-क/ धुळे /सरळसेवा/२०१०, दि. २४/१२/२०१० अन्वये जिल्हाधिकारी धुळे यांचे आस्थापनेवरील धुळे जिल्ह्यातील नगरपरिषदांमध्ये राज्यस्तरीय संवर्गातील श्रेणी-क-१ व श्रेणी-क-२ मधील रिक्त पदे सरळसेवेने भरावयाची आहे. त्यानुसार ईच्छुक व पात्र उमेदवारांकडून सदर जाहिरातीद्धारे **दि.** २/१/२०१३ पावेतो **फक्त ऑनलाईन पध्दतीने** अर्ज मागविण्यात येत आहेत.

**कार्यालयाचे नाव :- जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे**

**एकुण रिक्त पदे :- १५**

**संवर्ग निहाय रिक्त पदांचा तपशिल खालील प्रमाणे.**

**पदाचे नाव :- कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक/अतिक्रमण निर्मलुन अधिकारी**

१) **(महाराष्ट्र न पा अभियात्रीकी सेवा श्रेणी-क (स्थापत्य) )**

**भरावयाची एकुण पदे : - ३**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० % | १५ % | ५ % | ३ % | २ % | १० % | ३% | | |
| अनु. जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकूण** | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ३ |

२)**पदाचे नाव :- कनिष्ठ विद्युत पर्यवेक्षक**

**(महाराष्ट्र न पा अभियात्रीकी सेवा श्रेणी- क (विद्यूत) )**

**भरावयाची एकुण पदे : - २**

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० % | १५ % | ५ % | ३ % | २ % | १० % | ३% | | |
| अनु. जाती | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकूण** | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |

३) **पदाचे नाव :- Jr.Programmer/FacilityManager)**

**महाराष्ट्र न पा अभियात्रीकी सेवा श्रेणी- क (संगणक)**

भरावयाची एकुण पदे : - २

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० % | १५ % | ५ % | ३ % | २ % | १० % | ३% | | |
| अनु. जाती | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकूण** | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |

पदाचे नाव :- कनिष्ठ पाणी पुरवठा जलनिस्सारण व स्वच्छता पर्यवेक्षक
(महाराष्ट्र न पा जलदाय जलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रीकी सेवा श्रेणी-क )
भरावयाची एकुण पदे : - ४

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० % | १५ % | ५ % | ३ % | २ % | १० % | ३% | | |
| अनु. जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| खुला | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| **एकूण** | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ४ |

१) पदाचे नाव :- सहा.लेखापरिक्षक/सहा.लेखापाल
(महाराष्ट्र न पा लेखा व लेखा परिक्षण सेवा संवर्ग श्रेणी- क
भरावयाची एकुण पदे : - ३

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० % | १५ % | ५ % | ३ % | २ % | १० % | ३ % | | |
| अनु. जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| अनु. जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| **एकूण** | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ३ |

२) पदाचे नाव :- सहा .अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक

(महाराष्ट्र न पा अग्निशमन सेवा सवंर्ग श्रेणी-क

भरावयाची एकुण पदे : - ०१

| अनुशेषाचा प्रवर्ग | रिक्त पद संख्या | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | अंशकालीन | अपंग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त इतर | एकूण ा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० % | १५ % | ५ % | ३ % | २ % | १० % | ३% | | |
| खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| एकूण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

**उमेदवाराची शैक्षणिक अर्हता : खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता दिनांक 22/12/2012 रोजी प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.**

| पदाचा संकेतांक | पदाचे नाव व वेतनश्रेणी | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | **कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक/अतिक्रमण निर्मुलन अधिकारी** (महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी-क) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० | १)शासन मान्य विद्यापीठाची स्थापत्य विषयातील अभियांत्रिकी पदवी (बी.ई.सिव्हील) किंवा पदविका (डी. ई. सिव्हील) .<br>२) MS-CIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>३) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>४) न पा सेवेत आल्यानंतर न पा संचालयाने विहीत केलेली विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक .अशी विभागीय परिक्षा विहीत केली गेली नसल्यास आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे एल जी एस प्रमाणपत्र असणे आवश्यक |
| २ | **कनिष्ठ विद्युत पर्यवेक्षक** (महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा संवर्ग) (विद्युत) (श्रेणी-क) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी विषयातील पदवी (बी.ई. विद्युत) किंवा पदविका (डी.ई. विद्युत).पदवीधारकास प्राधान्य<br>२) MS-CIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>३) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>४) न पा सेवेत आल्यानंतर न पा संचालयाने विहीत केलेली विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक .अशी विभागीय परिक्षा विहीत केली गेली नसल्यास आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे एल जी एस प्रमाणपत्र असणे आवश्यक |
| ३ | **Jr.Programmer/FacilityMa Manager** (महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा संवर्ग) (संगणक) (श्रेणी-क) वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक विषयातील पदवी /DOEACC-LEVEL-A समकक्ष पदवीका<br>२) MS-CIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>३) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>४). न पा सेवेत आल्यानंतर न पा संचालयाने विहीत केलेली विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक .अशी विभागीय परिक्षा विहीत केली गेली नसल्यास आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे एल जी एस प्रमाणपत्र असणे आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| ४ | महाराष्ट्र **कनिष्ठ पाणी पुरवठा जलनिस्सारण व स्वच्छता पर्यवेक्षक**<br>(नगरपरिषद जलदाय, मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा संवर्ग)<br>(श्रेणी-क)<br>वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाचा यांत्रिकी/पर्यावरणअभियांता पदवी/पदवीका असणे आवश्यक (B.E./ D.E. Mechanical / Environmental/Chemical) किंवा Environmental Science मधील पदव्युत्तर/ पदवीका अर्हता. पदवीधारकास प्राधान्य<br>२) MS-CIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>३) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br><br>४)न पा सेवेत आल्यानंतर न पा संचालयाने विहीत केलेली विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक .अशी विभागीय परिक्षा विहीत केली गेली नसल्यास आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे एल जी एस प्रमाणपत्र असणे आवश्यक |
| ५ | **सहा.लेखापरिक्षक/ सहा.लेखापाल**<br>(महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व लेखा परिक्षण सेवा संवर्ग)<br>(श्रेणी-क)<br>वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० | १) शासन मान्य विद्यापीठाची वाणिज्य शाखेचा पदवीधर आणि (I.C.W.A.) किंवा(Chartered Accountant) असणे आवश्यक.<br>२) MS-CIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>३) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br><br>४)न पा सेवेत आल्यानंतर न पा संचालयाने विहीत केलेली विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक .अशी विभागीय परिक्षा विहीत केली गेली नसल्यास आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे एल जी एस प्रमाणपत्र असणे आवश्यक |
| ६ | **सहा .अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक**<br>(महाराष्ट्र नगरपरिषद अग्नीशमन सेवा संवर्ग)<br>(श्रेणी-क-२)<br>वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० | २) शासन मान्य विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवीधर आवश्यक. व राष्ट्रीय अग्नीशमन सेवा महाविद्यालय, नागपुर येथील उपस्थानक अधिकारी व प्रशिक्षक कोर्स उत्तीर्ण आवश्यक.<br>२) MS-CIT किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळाने प्रदान केलेले)<br>३) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक.<br>४)न पा सेवेत आल्यानंतर न पा संचालयाने विहीत केलेली विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक .अशी विभागीय परिक्षा विहीत केली गेली नसल्यास आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे एल जी एस (LGS) प्रमाणपत्र असणे आवश्यक |

## टिप :-

१) समांतर आरक्षणासंदर्भात दर्शविणेत आलेली पदसंख्या स्वतंत्र नाही. सदर आरक्षण त्या त्या प्रवर्गातील एकूण पदापैकी आहे. समांतर आरक्षणापैकी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराव्दारे सदरचे पद भरले जाईल.

२) सदर पदांमध्ये कमी जास्त बदल होण्याचा संभव आहे. म्हणून याबद्दल उमेदवारांनी कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यांत येणार नाही. हे अधिकार जिल्हाधिकारी धुळे यांनी राखून ठेवले आहेत.

## पदांकरीता वयोमर्यादा :-

१. उपरोक्त पदांकरीता **दिनांक** 15/12/2012 रोजीची वयोमर्यादा गणली जाईल.

२. उपरोक्त पदांकरीता **दिनांक** 15/12/2012 रोजीचे उमेदवाराचे वय खुल्या संवर्गासाठी १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. मागासवर्गीय उमेदवारांचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. परंतु उन्नत व प्रगत गटांमध्ये क्रिमीलेयर (Creamy Layer) मोडणा-या विजा.अ., भज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., विमाप्र आणि इमाव प्रवर्गातील उमेदवारांना ही सवलत लागू नाही.

४. सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या तीन वर्षाच्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना समांतर आरक्षण असलयास वयोमर्यादा ४६ वर्षे इतकी असेल.

५. खेळाडू उमेदवारांकरीता वयोमर्यादेची अट कमाल वयोमर्यादा अधिक ५ वर्षापर्यंत गुणवत्तेनुसार समांतर आरक्षण असलयास शिथील करणेत येईल.

६. माजी सैनिक :- सशस्त्र दलात किमान ६ महिने सलग सेवा केलेल्या माजी सैनिक मधील त्यांची सशस्त्र दलात केलेली अखंड सेवा काल अधिक ३ वर्ष एवढा काल त्यांच्या विहीत दिनांकाच्या वयातुन वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. अपंग माजी सैनिकांसाठी वयोमर्यादा समांतर आरक्षण असलयास ४५ वर्षे पर्यंत राहील.

७. अपंग उमेदवारांचे बाबतीत समांतर आरक्षण असलयास उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी राहील. अपंग प्रवर्गातील उमेदवाराचे किमान अपंगत्वाचे प्रमाणे ४० टक्के असल्याबाबतचा स्थायी वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच त्यांची निवड झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकिय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल, असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची अंतिम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे.

८. स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा समांतर आरक्षण असलयास ४५ वर्षे इतकी राहील

९. प्रकल्पग्रस्त /भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी समांतर आरक्षण असलयास वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

## परीक्षा शुल्क :-

**खुला प्रवर्ग** - रु. ५००/-                    **मागास प्रवर्ग** - रु. ३००/-

उक्त परीक्षा शुल्क **स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या** कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्जासोबत प्राप्त झालेल्या चलनाद्वारेच रोखीने भरणे आवश्यक आहे. माजी सैनिकांना परीक्षा शुल्क माफ आहे.यासाठी बँकेची वेळ पाळणे उमेदवाराची जबाबदारी राहील.

**टिप :-** वरील शुल्क हे जिल्हा निवड समितीसाठी आहे. याशिवाय शुल्क जिल्हा निवड समितीच्या नावाने जमा करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाकडून रु. ५०/- इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.;

## विशेष सूचना :-

१. अतिरिक्त संवर्ग, आंतर विभागीय समायोजन, विभागीय बदली व इतर विभागातील पदांचा आढावा. इत्यादी कारणांमुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी/ जास्त होणे ) आरक्षण /समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
२. नियुक्ती देणेचे नियमात, पदसंख्येत / आरक्षणांत बदल करणे, रद्द करणेचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी धुळे यांना राहतील.
३. शासनाने भरती बाबत / नियुक्ती बाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके ,आदेश इ. लागू राहतील.
४. महिला / माजी सैनिक / अंशकालीन कर्मचारी या समांतर आरक्षणातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्याच सामाजिक प्रवर्गातून समांतर आरक्षण विरहीत म्हणून भरली जातील.
५. भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रीया पूर्ण होई पावेतो सुधारित शासन निर्णय / परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

## अर्ज करण्याची पध्दत :-

१. प्रस्तुत पदांकरीता फक्त अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.
२. पात्र उमेदवाराला **वेब-बेस्ड (web-based) ऑनलाईन अर्ज** www.dhule.nic.in या वेबसाईटव्दारे **दि. 22/12/2012 ते दि. 02/01/2013** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.
३. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना www.dhule.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेत फी भरण्याचे चलन ०३ प्रतीमध्ये उपलब्ध होईल. (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत) सदर चलनाची प्रिंट काढून **परीक्षा शुल्क रोखीने** त्या चलनामार्फतच **02/01/2013 पर्यंत भरणे आवश्यक राहील** . उमेदवाराने फी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये भरणे आवश्यक राहील. सदरच्या तीन प्रतीपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत व जिल्हा निवड समितीची प्रत उमेदवारास स्टेट बँक ऑफ इंडिया, बँकेकडून परत मिळेल त्यापैकी जिल्हा निवड समितीची प्रत, अशा उमेदवाराने कागदपत्रांच्या छाननीचे वेळी जिल्हा निवड समितीकडे जमा करावी.

**सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराच्या कागदपत्रांची छाननी केली जाणार नाही तसेच चलनाची मुळ प्रत परिक्षेच्या दिवशी सोबत आणावी.**

४. बँकेमध्ये विहीत परिक्षा शुल्काचा चलनाव्दारे भरणा केल्यानंतर बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद **संकेतस्थळावर जाऊन करावी व ऑनलाईन अर्ज अपडेट करावा** . अर्ज सादर करण्याची (परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने Transaction ID नोंदविणे) आवश्यक आहे असे न केलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

५. बँकेकडून प्राप्त झालेला Transaction ID **एकापेक्षा अधिक अर्जाकरिता वापरु नये.** Transaction ID एकापेक्षा अधिक अर्जाकरिता वापरल्यास एकही अर्ज विचारात घेतला जाणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

६. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा चालू ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्रव्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ई-मेल आयडी द्वारे होणार असल्याने अचूक ई-मेल आयडी नोंदवणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) पासपोर्ट साईज फोटो असणे आवश्यक आहे तसेच स्वत:चा फोटो जिल्हा निवड समितीच्या सुचनेनुसार विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करताना फोटोची साईज ४० KB पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराकडे फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र परीक्षेच्या दिवशी आणणे आवश्यक आहे.

७. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाच्या बाबींचा तपशील www.dhule.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर **दि.** 6/1/2013 पासुन दिनांक 11 /1/2013 पर्यंत www.dhule.nic.in या संकेतस्थळावरुन परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे. **प्रवेशपत्रावर उमेदवाराने त्याचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्रावर राजपत्रित अधिका-याचे साक्षांकन करुन परिक्षेस आणणे आवश्यक आहे.** कोणत्याही उमेदवारास पोष्टाने प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही. प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास प्रवेश दिला जाणार नाही.

## पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, अटी व शर्ती :-

१) उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्र, अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. परंतू ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे.ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्ज भरतांना खोटी किंवा विसंगत / दिशाभूल माहिती भरलेचे निदर्शनास आल्यास संबंधीत उमेदवारावर फसवणूकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

**२) अंतिम निवड**

अ) उमेदवाराची अंतिम निवड हि लेखी व तोंडी परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना **समान गुण मिळाल्यास** खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

१) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार, त्यानंतर

२) मागास वर्ग उमेदवाराच्या बाबतीत प्रथम अनुसूचित जमातीमधील नंतर अनुसूचित जाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती, भटक्या जमाती जानेवारी-१९९० इ पूर्वीच्या २८ तत्सम जमाती), भटक्या जमाती (धनगर व तत्सम), इतर मागासवर्ग या क्रमाणे; त्यानंतर

३) शारीरिक दृष्ट्या अपंग असलेले उमेदवार त्यानंतर
४) माजी सैनिक असलेले उमेदवार त्यानंतर
५) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले उमेदवार
६) वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल.)

वरील प्रत्येक संवर्गामध्ये महिलांना अग्रक्रम देण्यात येईल.

३) उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामूळे लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. नियुक्तीपूर्वी, मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, आवश्यक असल्यास अद्ययावत नॉनक्रिमीलेअर दाखला, तसेच आवश्यक ती कागदपत्रे / साक्षांकित प्रमाणपत्रे (साक्षांकन हे केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी / पोस्टमास्तर / प्राचार्य व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे) इ. ची छाननी संबंधीत नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. त्यावेळी मूळ प्रमाणपत्रे दाखविणेही बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती वरील प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही / नियुक्ती रद्द होईल. तसेच या पदासंबंधी शासनाकडून आवश्यक सहमती प्राप्त झाल्यानंतरच उमेदवारांना नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

४) वरील पदासाठी **दि. १३/०१/२०१३** रोजी परीक्षा घेण्यात येणार आहे.

५) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र त्यांचेकडेस असणे आवश्यक आहे. अर्जदार यांचेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय दि. २७ जून २०११ नुसार त्यांचेकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झ्‍ालेबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.

६) सदर पदांसाठी आवश्यक अर्हता असणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल.

७) गुणवत्ता यादीमध्ये येणा-या उमेदवारांना मुळ कागदपत्रांची तपासणी करणेकरीता बोलाविण्यात येईल. उमेदवारांना कागदपत्रे तपासणीच्या वेळी मुळ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास / माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही.

८) उक्त पदांसाठी छाननी न करता जाहिरातीनुसार परिपुर्ण अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी परीक्षा केंद्राचा सांकेतांक क्रमांक, वेळ व दिनांक इत्यादी तपशील www.dhule.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र www.dhule.nic.in या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.

९) लेखी परीक्षेसाठी व कागदपत्रांच्या छाननीसाठी उमेदवारास स्वखर्चाने यावे लागेल.

१०) जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र, धुळे या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्रपणे **रितसर ऑनलाईन अर्ज** करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

११) विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

१२) नियुक्ती झाल्यानंतर उमेदवारांना मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे आदेशास अधिन राहून जिल्ह्यातील कोणत्याही नगरपरिषदांमध्ये नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १५ दिवसाचे आत रुजू होणे आवश्यक राहील.

१३) शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६६-ब दिनांक १२/१२/२०११ नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१४) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमूक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासून आमंलात आणला आहे. त्यानूसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व विजाअ, भजब, भजक, भजड, विमाप्र व इमाव यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे ३१ मार्च २०१३ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमिलीअरचे तत्व अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गाना लागू राहील.

१५) उक्त नमूद पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत येणाऱ्या उमेदवारांना त्यांचे पदासाठी आवश्यक असणारे कागदपत्र पडताळणीच्या वेळी त्यांचे शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबातचे (नॉन क्रिमिलेअर) सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, संगणक हाताळणी अर्हता प्रमाणपत्र, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरले असल्यास अशा परवानगीचे पत्र व इतर आवश्यक सर्व मुळ कागदपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दिनांक १/७/२००५ व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन विवाहित/अविवाहित उमेदवारांनी सादर करणे अनिवार्य आहे.

१६) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक१९ मार्च २००३ नुसार गट क संवर्गातील उमेदवारांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत शासनाने ठरवून दिलेली संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील.

१७) शासन वित्त विभाग निर्णय क्रं अनियो /१०/०५/१२६/सेवा ४/दिनांक ३१/१०/२००५ नुसार दि. १ नोंव्हेबर २००५ रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से. (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४)आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१८) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१९) उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

२०) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली, म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे उमेदवारांनी समजू नये.

२१) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना व भरतीची जाहिरात www.dhule.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२२) ऑनलाईन पध्दतीने उमेदवाराने अर्ज भरल्यानंतर जोपर्यंत उमेदवार परीक्षा शुल्क भरलेचे **Transaction ID ऑनलाईन उमेदवारी अर्जावर स्वत: बिनचूक Update** करीत नाही तोपर्यंत त्यांचा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही.

## समांतर आरक्षणातंर्गत असलेल्या कोटयासाठी अटी व शर्ती:-

अ) **अंशकालीन उमेदवारासाठी :-**

अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी सुशिक्षित बेरोजबार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये ०३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले पाहीजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

ब ) **माजी सैनिक उमेदवारासाठी :-**

गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित/साक्षांकित प्रत व इतर आवश्यक कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिका-यांकडून पडताळणी झाल्या शिवाय त्यांना नियुक्ती आदेश देणेत येणार नाही.

क) **महिलांसाठी असलेले आरक्षण** :-

महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/ का-२ दिनांक २५ मे २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी वर्ष २०१२ - २०१३ या कालावधीकरीता वैध असलेले (अर्थात दि.३१/३/२०१३ पर्यत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमिलेयर) प्रमाणपत्र **तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.**

ड) **अत्युच्च्य गुणवत्ताधारण खेळाडू उमेदवारासाठी :-**

अत्युच्च्य गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रंमाक रक्रिधो-२००२/प्रक्र ६८/क्रियूसे-२ दिनांक ३० एप्रिल २००५ मधील तरतूदीनुसार राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे सदर शासन निर्णयासोबतच परिशिष्ट अ मध्ये नमूद खेळामध्ये राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावर प्रविण्य मिळविल्याचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे असावे. लेखी परीक्षेत निवड झालेल्या खेळाडू उमेदवारांचे खेळाबाबतचे प्रमाणपत्र हे क्रिडा संचालनालय पुणे यांचे कार्यालयातून पडताळणी करुन वैध असलेचे प्रमाणपत्र असल्याशिवाय खेळाडू प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश दिला जाणार नाही.

**इ** ) **भुकंपग्रस्त उमेदवारासाठी :-**

गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या भुंकपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी (जिल्हाधिकारी) यांचे भूकंपग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले प्रमाणपत्राच्या कागदपत्रांच्या तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**फ** ) **प्रकल्पग्रस्त उमेदवारासाठी :-**

गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी (जिल्हा पुनर्वसन अधिकारी) यांचे प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले प्रमाणपत्राच्या कागदपत्रांच्या तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

## परीक्षेचे स्वरुप व निवड पध्दती :-

| पदाचा संकेतांक | पदनाम | परीक्षेसाठी गुण | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | मुलाखत | |
| १ | **पदाचे नाव**:- कनिष्ठ बांधकाम पर्यवेक्षक/अतिक्रमण निर्मुलन अधिकारी<br>महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा (स्थापत्य) (श्रेणी-क) | २०० | २५ | २२५ |
| २ | **पदाचे नाव**:- कनिष्ठ विद्युत पर्यवेक्षक<br>महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा संवर्ग (विद्युत) (श्रेणी-क) | २०० | २५ | २२५ |
| ३ | **पदाचे नाव** :- (Jr.Programmer/Facility Manager<br>महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा संवर्ग (संगणक) (श्रेणी-क) | २०० | २५ | २२५ |
| ४ | **पदाचे नाव** :- कनिष्ठ पाणी पुरवठा जलनिस्सारण व स्वच्छता पर्यवेक्षक<br>महाराष्ट्र नगरपरिषद जलदाय, मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा संवर्ग (श्रेणी-क) | २०० | २५ | २२५ |
| ५ | **पदाचे नाव** :- सहाय्यक लेखा परिक्षक/सहाय्यक लेखापाल<br>महाराष्ट्र नगरपरिषद लेखा व लेखा परिक्षण सेवा संवर्ग (श्रेणी-क) | २०० | २५ | २२५ |
| ६ | **पदाचे नाव** :- सहाय्यक अग्निशमन स्थानक पर्यवेक्षक<br>महाराष्ट्र नगरपरिषद अग्नीशमन सेवा संवर्ग (श्रेणी-क-२) | २०० | २५ | २२५ |

## परीक्षेचे स्वरुप :-

- शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. प्रनि.म.२००७/प्रक्र४६/०७/१३/अ दिनांक १९/१०/२००७ मधील तरतुदीनुसार लेखी परीक्षेमध्ये व तोंडी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर निवड करण्यात येईल.
- लेखी परिक्षा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल. त्यासाठी १०० प्रश्नांना प्रत्येकी २ गुण याप्रमाणे २०० गुण असतील. **१०० प्रश्नांपैकी ५० प्रश्न संबंधित सेवेच्या (पदाच्या) आवश्यक शैक्षणिक पात्रतेच्या स्तरावरील दर्जाचे असतील. उर्वरित ५० प्रश्न मराठी, इंग्रजी व सामान्य क्षमता चाचणीशी निगडीत असतील.** निगेटीव्ह मार्कींग पध्दत असणार नाही. **लेखी परीक्षा दि. १३/०१/२०१३ रोजी घेण्यात येईल.** लेखी परीक्षेमधुन पात्र होणा-या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीचा दिनांक नंतर कळविला जाईल.
- लेखी परीक्षेमध्ये व तोंडी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या अधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणीक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
- वरील पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
- लेखी परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना त्यांना मिळालेले गुण www.dhule.nic.in या संकेस्थळावर पाहता येतील, या गुणवत्ता यादीतून सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय अंतरिम गुणवत्ता यादी उक्त संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.
- परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. २७ जून २००८ मधील नमूद निकषावर क्रम लावला जाईल.

- वरील गुणवत्ता यादीमधील गुणानुक्रमे पात्र व आरक्षण विचारात घेवून कागदपत्रांच्या पडताळणीसाठी पात्र करण्यात आलेल्या उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सूचनानुसार त्यांच्या कागदपत्रांच्या छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास, वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्रांच्या छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास त्यांचे निवडीबाबत जिल्हा निवड समिती विचार करणार नाही.
- निवड झालेले उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे शारीरीक क्षमतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

## रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे

| अ.क्र | भरती प्रकिया कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचा कालावधी | दिनांक 22/12/2012 (सकाळी 11-00 पासून) ते दिनांक 02/01/2013(दुपारी 12.00 वाजे पर्यंत) |
| २ | बँकेत विहित चलनाद्वारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक 22/12/2012 (सकाळी 11-00 पासून) ते दिनांक 02/01/2013 (बँकेच्या कार्यकाळात) |
| ३ | Transaction-ID संकेतस्थळावर नोंदविण्याचा अंतिम दिनांक | दिनांक 4/1/2013 सायंकाळी 6.00 वाजे पर्यंत. |
| ४ | लेखी परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | दिनांक 6/1/2013 पासुन दिनांक 11 /1/2013 पर्यंत |
| ५ | लेखी परीक्षा (बँकेच्या कार्यकाळात) | दिनांक 13/1/2013 सकाळी 11-00 ते 01-00 वाजे पर्यंत. |

## विशेष सूचना:-

- लहान कुटूंबाचे नुमुना अ चे प्रतीज्ञापत्र भरणे आवशक आहे.
- या परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नाही, तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी विनाकारण अर्ज करु नयेत.
- अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी असल्यास त्यासाठी ८७९३०८३७१२/१३/१४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

दिनांक :- २२/12/2012
स्थळ :- धुळे

**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा**
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे**

**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी धुळे**